ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - II April - June - 2019

English / Marathi / Hindi

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

✣ EDITOR ✣
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

✣ PUBLISHED BY ✣

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with Oken Scanner

# ४. महाराष्ट्रातील आधारभुत संरचनेची सद्यस्थिती : एक आढावा

प्रा. डॉ. माधवराव नरसिंगराव बिरादार
सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि. नांदेड.

### प्रास्ताविक

अर्थव्यवस्थेचे कोणतेही क्षेत्र असे, तेथे जलद गतीने व परिणामकारक विकास घडुन येण्यासाठी उत्पादनाच्या क्षेत्राला गतीमान करावे लागते आणि उत्पादनाच्या क्षेत्राला गतीमान करण्यासाठी अर्थव्यवस्थेतत एकुणच आधारभूत संरचनेला गतीमान अथवा विकसित करावे लागते. कारण जगभरातल्या कोणत्याही अर्थव्यवस्थेचा वास्तविक आर्थिक विकास हा आधारभूत संरचनेवरच अवलंबून असतो. योग्य व पर्याप्त आधारभूत संरचनेशिवाय अर्थव्यवस्थेतील आर्थिक व सामाजिक समस्या सोडविताच येणार नाहीत. आधारभूत संरचनेमधील घटक प्रत्यक्षपणे उत्पादन करीत नाहीत, परंतु आर्थीक व्यवहाराची पातळी उंचावण्यासाठी परिस्थीतीची अनुकूलता निर्माण करतात. म्हणुन उत्पादन प्रक्रियांना अप्रत्यक्षपणे सहाय्यभूत ठरणाऱ्या विविध स्वरुपातील सामाजीक भांडवलाला आधारभुत किंवा पायाभुत संरचना असे म्हणतात. ज्या सेवा, सुविधा व अर्थव्यवस्थेतील इतर क्षेत्राचे कार्य सुलभ होऊन त्याच्या विकासाला चालना मिळते त्या सर्वांचा समावेश पायाभूत संरचना या संकल्पनतेत होतो. सर्वसामान्य लोकांचे दैनंदिन जीवन सुखी होण्यासाठी देखील या सेवा सुविधांचा उपयोग होतो जसे की, शेती क्षेत्राचा विकास जलसिंचनाच्या सोयी, सुलभ कर्जाच्या सोयी या गोष्टींवर अवलंबुन असतो. औद्योगिक क्षेत्राचा विकास रस्ते, वीज पुरवठा, बँकिंगच्या सोयी, उत्तम संपर्क माध्यमाच्या सोयी यावर अवलंबुन असतो. या दोन्ही क्षेत्राच्या विकासासाठी शिक्षण व आरोग्यविषयक सोयी महत्वाच्या असतात. सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनासाठी सुद्धा रस्ते, पिण्यायोग्य पाणी, वीज, शिक्षण, आरोग्याच्या गोष्टी महत्वाच्या असतात. या सर्वांना मिळून अर्थव्यवस्थेची आधारभुत संरचना असे म्हणतात. यालाच पायाभुत संरचना किंवा मुलभूत घटक असे देखील म्हटले जाते. प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील पायाभूत संरचना विशेष करुन रस्ते, रेल्वे, हवाई व जलवाहतुक ही वाहतुक साधने, वीजनिर्मिती, शिक्षण व सार्वजनिक आरोग्य यासारख्या पायाभूत संरचनेच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आलेला आहे.

1) **वीजनिर्मिती :-** विकासाच्या मुलभूत सोयी-सुविधेमध्ये वीज महत्वाची असून अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग, वाणिज्य, रेल्वे वाहतुक, उत्पादन व दळणवळण तंत्रज्ञान, पाणीपुरवठा, घरगुती वापर व सार्वजनिक दिवाबत्ती यात वीजेचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. महाराष्ट्रात वीजेचे उत्पादन, वहन व वितरण यावर देखरेख करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 20 जून 1960 रोजी 'महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची' स्थपना केली. केंद्रसरकारच्या केंद्रिय विद्युत कायदा 2003 यानूसार राज्य विद्युत मंडळाचे तीन कंपन्यामध्ये विभाजन करण्याचा निर्णय 3 जुन 2005 रोजी घेण्यात आला. वीजनिर्मिती करणारी 'महाराष्ट्र राज्य वीद्युतनिर्मती कंपनी' (महानिर्मिती), वहन करणारी महाराष्ट्र

राज्य विद्युत पारेषण कंपनी (महापारेषण) आणि वितरण करणारी महाराज्य राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण) या नावाने ओळखल्या जातात. महानिर्मितीच्या मालकीची कोराडी (नागपुर), खापरखेडा (नागपुर), बल्लारपुर व दुर्गापुर (चंद्रपूर), पारस (अकोला), परळी (बीड), भुसावळ (जळगाव), व एकलहरे (नाशिक) येथे सात औष्णीक वीजनिर्मिती केंद्रे आहेत. तसेच एक वायूटबाईन वीनिर्मिती केंद्र व कोयनेसह इतर 24 जलविद्युत निर्मिती केंद्रे कार्यान्वित आहेत. राज्यात पारंपारिक व अपारंपारिक अशा दोन उर्जासाधनाद्वारे विजेचे उत्पादन केले जाते. पारंपारिक उर्जासाधनामध्ये दगडी कोळसा, खनिजतेल, पाणी, नैसर्गिक वायू तसेच अणुशक्ती यांचा वापर करुन वीज उत्पादन केले जाते तर अपारंपारिक उर्जासाधनामध्ये सौर उर्जा, पवनउर्जा, जैविक उर्जा, सागरी लाटापासुन निर्माण होणारी उर्जा यांचा समावेश होतो. महाराष्ट्र शासनाने अपारंपारिक उर्जा स्त्रोत विकासांतर्गत सन 1986 मध्ये 'महाराष्ट्र राज्य उर्जा विकास अभिकरण' (मेडा) ची स्थापना केली आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली त्यावेळेस राज्यातील एकूण वीनिर्मिती 3268 दसलक्ष किलोवॅट तास होती. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2018-19 मधील आकडेवाडीनुसार मार्च 2019 अखेर राज्यात 114199 मधील दसलक्ष किलोवॅट तास पर्यंत वाढली आहे. गेल्या अठ्ठावन्न वर्षातील वीजनिर्मती मधील ही वाढ जवळजवळ 35 पट इतकी आहे.

2) **रस्ते वाहतुक :-** भुमार्गावरील वाहतुकीच्या साधनामध्ये रस्ते वाहतुकीला विशेष असे महत्व आहे. रस्ते उपलब्ध झाल्याशिवाय माणसाच्या गरजेनुसार एका ठिकाणाहुन दुसरीकडे मालवाहतुक व प्रवाशी वाहतुक होणे अशक्य असते. रस्त्यामुळे शहरी विभाग, ग्रामीण विभाग, बाजारपेठ, कारखाने, प्रशासकीय केंद्रे, सांस्कृतीक केंद्रे इत्यादी सर्व क्षेत्रे परस्परांशी जोडले जातात. त्यामुळे विकासाची गती वाढते. एवढेच नव्हे तर रस्त्यामुळे सुदूर पहाडी क्षेत्र, दुर्गम क्षेत्र, राज्याच्या व देशाच्या इतर भागाशी जोडता येतात. तसेच रस्ते वाहतुक ही इतर वाहतुकीस पुरक आहे. रेल्वे वाहतुक स्टेशनपर्यंत, हवाई वाहतुक विमानतळापर्यंत तर जलवाहतुक बंदरापर्यंत असते. त्यानंतर मात्र निर्देशीत ठिकाणी जाण्यासाठी रस्ते वाहतुकीचाच उपयोग करावा लागतो. महाराष्ट्राच्या निर्मितीपासूनच राज्य शासनाने रस्त्याचे जाळे निर्माण करण्यावर विशेष भर दिला आहे. रस्त्याच्या जाळ्यामध्ये राष्ट्रीय महामार्ग, राज्य प्रमुख मार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा रस्ते, इतर जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते व अंतर्गत शहर रस्ते यांचा समावेश होतो. राज्यातील रस्त्याच्या विकास राज्य शासनाचा सर्वजनीक बांधकाम विभाग, जिल्हा परिषदा, वन विभाग, महानगरपालीका, नगरपालीका, नगरपंचायती, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, शहर व औद्योगिक विकास महामंडळ आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधीकरण या यंत्रणा मार्फत केला जातो. महाराष्ट्राची निर्मिती झाली त्यावेळेस सर्व प्रकारच्या रस्त्याची एकूण लांबी 38242 कि.मी. इतकी होती. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2018-19 मधील आकडेवाडीनुसार मार्च 2018 अखेर राज्यातील रस्त्याची एकुण लांबी 304045 कि.मी. पर्यंत पोहोचली आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग 12275 कि.मी, राज्यमहामार्ग 32390 कि.मी, प्रमुख जिल्हा रस्ते 55383 कि.मी. इतर जिल्हा रस्ते 58116 कि.मी, ग्रामीण रस्ते 145881 कि.मी.



Scanned with Oken Scanner

चा समावेश आहे. सन 1960 ते 2018 या आठ्ठावन वर्षाच्या कालावधीत राज्यातील सर्व प्रकारच्या रस्त्याच्या लांबीत वाढ झाली असून या कालावधीत एकुण रस्त्याची लांबी जवळजवळ आठ पटीने वाढली आहे.

3) **रेल्वे वाहतुक :-** सुमारे दिड शतकापुर्वीच भारतातील पहिला रेल्वे मार्ग 16 एप्रिल 1853 रोजी महाराष्ट्रात मुंबई ते ठाणे दरम्यान सुरु झाला. सन 1860 पर्यंत हा मार्ग पूण्यापर्यंत वाढविण्यात आला. पहिल्या महायुद्धानंतर राज्याच्या निरनिराळ्या भागात रेल्वे मार्ग सुरु झाले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीवेळेस राज्यात 5057 कि.मी. इतकी रेल्वे मार्गाची लांबी होती. महाराष्ट्राची आर्थीक पाहणी 2018-19 मधील आकडेवाडीनुसार मार्च 2018 अखेर राज्यातील रेल्वे मार्गाची एकुण लांबी 6114 कि.मी. (382 कि.मी. कोकण रेल्वेसाठी) होती व ती भारतातील एकुण रेल्वे मार्ग (68442 कि.मी.) लांबीच्या 8.9 टक्के इतकी होती. सध्या राज्यात रेल्वे मार्गाची अनेक नवीन कामे सुरु आहेत. त्यामध्ये बारामती-लोनंद (64 कि.मी.), बेलापुर सीवूड-उरण (27 कि.मी.), अहमदनगर-बीड-परळी (261 कि.मी.), वर्धा-यवतमाळ-नांदेड (284 कि.मी) चा समावेश आहे. तर पेण-रोहा (40 कि.मी.) दुपरीकरण, भूसावळ-जळगाव तिसरा मार्ग (24 कि.मी) दुपदीकरण, टिगाव चिंचोर्डा तिसरा मार्ग (17 कि.मी.) दुपदीकरण, कल्याण-कसरा तिसरा मार्ग (68 कि.मी.) दुपदरीकरणाची कामे चालू असून ती प्रगतीपथावर आहेत. याशिवाय वाढत्या नागरीकरणामूळे शहरी वाहतुक समस्येचे निराकरण करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प, नवी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प, नागपुर मेट्रो रेल्वे प्रकल्प, पुणे मेट्रो प्रकल्प, राबविण्यात येत असुन सदर कामे देखील प्रगतीपथावर आहेत.

4) **हवाई वाहतुक :-** हवाई वाहतुक ही सर्वात अधुनिक वाहतुक सेवा असून प्रवाशांच्या व वजनाने हलक्या मौल्यवान वस्तु, नाशवंत वस्तुची वाहतुक करण्याचे अत्यंत वेगवान असे साधन आहे. सार्वजनिक क्षेत्रातील 'इंडियन एअरलाईन्स कार्पोरेशन' द्वारा देशातील महानगरांना हवाई वाहतुकीद्वारे जोडण्यात आले आहे तर एअर इंडीया इंटरनॅशनल कार्पोरेशन द्वारे आंतराष्ट्रीय हवाई मार्गावर वाहतुक सेवा उपलब्ध करुन दिली गेली आहे. सन 1990 पासुन भारत सरकारकडून हवाई वाहतुक सेवा खाजगी क्षेत्रासाठी मुक्त करण्यात आले. त्यामुळे अनेक खाजगी कंपन्या नागरी विमान वाहतुकीच्या क्षेत्रांत उतरल्या व त्यांनी मुख्य मार्गावरील बरीचशी वाहतुक खाजगी क्षेत्राकडे वळविली आहे. महाराष्ट्रात हवाई वाहतुकीचा बराच विकास झाला असुन राज्यात देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही हवाई वाहतुक व्यवस्था उपलब्ध आहेत. मुंबई, पुणे, नागपुर येथे आंतरराष्ट्रीय विमानतळे आहेत तर 13 ठिकाणी देशांतर्गत विमानतळे आहेत. मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळावरील वाढता ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई येथे अतिरिक्त विमानतळ उभारण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने विशेष उद्देश कंपनी म्हणुन 2002 मध्ये 'महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित' (MADC) स्थान केली आहे. या कंपनीकडून महाराष्ट्रातील शिर्डी, सोलापुर, अमरावती, जवळगांव, चंद्रपुर, गडचिरोली या ठिकाणी विमानतळ विकसित करण्यात येत आहेत. या व्यतिरिक्त शासनाने नांदेड, कोल्हापुर, यवतमाळ, लातुर, उस्मानाबाद, बरामती, रत्नागिरी व सिंधूदुर्ग या ठिकाणी नवीन विमानतळे उभारण्याचा निर्णय यपूर्वीच घेतला असुन यापैकी नांदेड व कोल्हापुर विमानतळावरुन नागरी

हवाई वाहतुक सेवा सुरु झाली आहे. महाराष्ट्राची आर्थिक आर्थिक पाहणी 2018-19 मधील आकडेवारीनुसार मार्च 2017 अखेर राज्यातून देशातंर्गत व आंतरराष्ट्रीय प्रवाशी व मालवाहतुक अनुक्रमे 453.23 लाख व 138.29 मे.टन इतकी झाली असु सर्वाधीक प्रवाशी वाहतुक मुंबई विमानतळावरुन झाल्याचे दिसून येते. राज्यातुन झालेली हवाई मालवाहतुकीत वाढ झाली असुन मार्च 2018 अखेर देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय मालवाहतुक अनूक्रमे 310740 मे. टन व 648881 मे.टन इतकी होती. सर्वाधिक देशांतर्गत मालवाहतुक व आंतराष्ट्रीय मालवाहतुक ही मुंबई येथून झाल्याचे चित्र आहे.

5) जलवाहतुक :- जलवाहतुक ही वाहतुकीच्या इतर पर्यायाच्या तुलनेने किफायतशीर, पर्यावरणस्नेही आणि प्रवशी खर्चात बचत करणारी आहे. अवजड व जास्त आकारमानाच्या वाहतुकीस जलमार्ग अधिक उपयुक्त असून ती अधिक सुरक्षीतही आहे. जलमार्ग वाहतुकीचे प्रामुख्याने अंतर्गत जलवाहतुक व सागरी जल वाहतुक असे दोन प्रकार आहेत. देशाच्या अंतर्गत विकासाच्या दृष्टीने अंतर्गत जलवाहतुक तर विदेशी व्यापाऱ्याच्या दृष्टीने सागरी जलवाहतुकीला विशेष महत्व आहे. महाराष्ट्रांला सुमारे 720 कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला असुन या समुद्र किनाऱ्यावर मुंबई सारखे नैसर्गिक बंदर आहे. तर कोकणच्या किनारपट्टीवर उत्तरेस डहाणूपासून दक्षिणेस [illegible] 48 नोंदणीकृत लहान बंदरे आहेत. मुंबई बंदरामध्ये अ) मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि ब) नाव्हाशेवा येथे जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट अशी दोन मोठी बंदरे आहेत. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2018-19 मधील आकडेवारीनुसार मार्च 2018 अखेर मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांनी अनुक्रमे 628.28 लाख मे. टन व 660.04 लाख मे. टन सागरी मालाची वाहतुक केली असून मुंबई पोर्ट ट्रस्टमधील एकुण मालवाहतुकीत आयात 424.79 लाख मे. टन व निर्यात 203.49 लाख मे. टन तर जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट मधून आयात 369.48 लाख मे. टन व निर्यात 290.56 लाख मे. टन चा समावेश आहे. राज्यातील 48 लहान बंदराच्या विकासासाठी शासनाने 22 नोव्हेंबर 1996 रोजी 'महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड' स्थापन केले आहे. या लहान बंदरातुनही मालवाहतुक व प्रवाशी वाहतुक केली जाते. मार्च 2018 अखेर या लहान बंदरातुन मालवाहतुक 373.67 लाख मे. टन तर प्रवाशी वाहतुकही 191.19 लाख मे. टन इतकी झाली आहे.

6) **शिक्षण :-** देशाच्या कृषी व औद्योगिक विकासासाठी रस्ते, रेल्वे, हवाई व जलवाहतुकीच्या सोयी, उर्जा, वित्तपुरवठा, बाजारपेठ या आधारभूत संरचनेबरोबरच कुशल व कार्यक्षम मनुष्यबळासाठी सर्वंना कौशल्यपुर्ण शिक्षण उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. शिक्षणामुळे वैयक्तिक व सांधिक उत्कर्षांच्या संधी उपलब्ध होतात. कौशल्य व ज्ञान प्रदान करुन लोकांचे सबलीकरण करण्याचे शिक्षण हे महत्वाचे साधन आहे. त्यामुळे देशात प्राथमिक शिक्षणापासुन पदवी, पदव्यूत्तर, तंत्रशिक्षण, स्त्री शिक्षण, प्रोढशिक्षण इत्यादीचा विकास व विस्तार केला जात आहे. महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा विकास व विस्तारासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नामुळे प्राथमिक शिक्षणापासुन पदवी व तांत्रीक शिक्षणापर्यंत शैक्षणिक संस्था, त्यातील विद्यार्थी व शिक्षक संख्येत मोठी वाढ झाली आहे. परिणामी



Scanned with Oken Scanner

साक्षरता प्रमाणात झपाट्याने वाढ घडून आली आहे. जनगणना 2011 नुसार साक्षरतेत राष्ट्रीय स्तरावर राज्याचा 12 वा क्रमांक असून साक्षरता दर 82.3 टक्के आहे. जो राष्ट्रीय स्तरावरील साक्षरतेच्या सरासरीपेक्षा (73 टक्के) बराच जास्त आहे. महाराष्ट्राची आर्थीक पाहणी 2018-19 नुसार मार्च 2018 अखरे राज्यात प्राथमिक (1 ते 8) आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक (9 ते 12) विद्यालयाची एकुण संख्या अनुक्रमे 106546 हजार व 26857 हजार इतकी होती तर विद्यार्थी संख्या अनुक्रमे 15902 हजार व 6648 हजार इतकी होती. त्याचबरोबर प्राथमिक शिक्षकांची संख्या 542 हजार व माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांची संख्या 216 हजार इतकी आहे. प्राथमिक व माध्यमिक शाळातील विद्यार्थी शिक्षकांचे प्रमाण अनुक्रमे 29.4 व 30.5 इतके आहे.'

मूलभूत शिक्षणाच्या सार्वत्रिकरण व्यतिरिक्त उच्चशिक्षणातील संधीचा देखील विस्तार करण्याची शासनाची भूमिका आहे. उच्चशिक्षणात सर्वसाधारण उच्चशिक्षणाबरोबरच कृषी, पशूवैधक, औषधनिर्माण, अभियांत्रिकी, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण इत्यादींचा समावेश होतो. अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवाल 2017-18 नूसार राज्यात 54 विद्यापीटे आहेत. त्या 27 राज्यविद्यापिठे (22 सार्वजनिक, 4 खाजगी व 1 मुक्त), 21 अभिमत विद्यापिठे (12 खाजगी, 7 शासकिय व 2 शासकिय अनुदानीत), 5 राष्ट्रहितासाठीच्या संस्था व एक केंद्रिय विद्यापीठ आहे. सप्टेंबर 2018 अखेर राज्यात महाविद्यालयाची संख्या 4314 इतकी आहे. त्यात उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 41.31 लाख इतकी असुन शिक्षकांची संख्या 1.52 लाख इतकी आहे. उच्चशिक्षणातील विद्यार्थी व शिक्षकांचे प्रमाण 27 इतके आहे.

7) सार्वजनिक आरोग्य :- सार्वजनिक आरोग्य सेवेचा उद्देश मानसिक आरोग्यासह, रोगप्रतिबंध व रोगउपचार करुन मानवी जीवनाची गुणवत्ता सुधारणे हा आहे. सर्व वयोगटातील लोकांसाठी उत्तम आरोग्याची सुनिश्चिती करणे आणि चांगल्या जीवनमानास चालना देणे हे शाश्वत विकासाचे ध्येयाचे एक उदिष्ट आहे. सर्वांना खात्रीपुर्वक सुलभ आणि किफायतशीर आरोग्यसेवा मिळण्याकरीता शासन विविध आरोग्यविषयक योजना व कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी करीत आहे. सर्वसमावेशक आरोग्य सेवा पुरविण्यासाठी राज्याने त्रिस्तरीय पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत. उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामूहीक आरोग्य केंद्रे (ग्रामीण रुग्णलये) यांचा प्राथमिक स्तरावर समावेश होतो. द्वितीय स्तरावर उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये यांचा समावेश होतो तर तृतीय स्तरात प्रमुख शहरातील सुसज्य वैद्यकीय महाविद्यालये व सूपरस्पेशालीटी रुग्णालये यांचा समावेश होतो. राज्यात 31 जानेवारी 2018 पर्यंत 10668 उपकेंद्रे, 1828 प्राथमिक आरोग्य केंद्रे, 364 ग्रामीण रुग्णालये, 193 प्राथमिक आरोग्य पथके, 40 फिरती आरोग्य पथके. 91 उपजिल्हा रुग्णालये, 23 जिल्हा रुग्णालये, 17 वैद्यकिय महाविद्यालयाशी संलग्नीत रुग्णालये, 8 सामान्य रुग्णालये, 13 स्त्री रुग्णालये, 4 मनोरुग्णालये, 4 कुष्ठरोग रुग्णालये, 4 क्षयरोग रुग्णालये कार्यरत आहेत.

**सारांश**

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासूनच राज्यात आधारभुत संरचनेच्या मोठ्या प्रमाणावर विकासास मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली. गेल्या आठ्ठावन वर्षात आधारभूत संरचनेत करण्यात आलेल्या प्रचंड गुंतवणुकीमुळे राज्यात आधारभूत संरचनेत प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. जसे 1961 ते 2018 या काळात विजेच्या उत्पादनात 3268 दसलक्ष किलोवॅट तास वरुन 107058 दसलक्ष किलो वॅट तास वर झाले आहे. त्याचप्रमाणे इतरही आधारभूत संरचनेत म्हणजे वाहतुक साधने, शिक्षण, आरोग्य इत्यादीतही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आधारभूत संरचनेत केलेल्या प्रचंड गुंतवणीमुळे शेती व औद्योगिक उत्पादनांत प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. ग्रामीण भागातही मुलभूत संरचना उपलब्ध करुन देण्यात आल्या. जसे जलसिंचनाच्या सोयी, ग्रामीण विद्युतीकरण इत्यादी असे असले तरी ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात या सोयी-सुविधा पुरविण्याकडे अधिक लक्ष देण्यात आले आहे. डांबरी रस्ते, सुसज्ज दवाखाने, तंत्रमहाविद्यालये, वैद्यकिय महाविद्यालये, बँका, इत्यादीच्या सोयी शहरात आढळतात. ग्रामीण भागात जलसिंचनाच्या सोयी, विज पुरवठा, टेलीफोनच्या सोयी, सर्वत्र आढळून येत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागाचा पुरासा विकास होऊ शकला नाही. परिणामी ग्रामीण भागात पुरेशा प्रमाणात रोजगार निर्माण होऊ शकला नाही. त्यामुळे रोजगारासाठी शहरी भागाकडे लोकांची गर्दी होऊ लागली आहे. त्यातुन लोकांच्या राहत्या घरांचा प्रश्न, आरोग्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणांत निर्माण झाले आहेत. तसेच आधारभुत संरचनेतील सोयी-सुविधांचा फायदा उच्चभ्रु व श्रीमंत लोकांनाच मोठ्या प्रमाणावर झाला. जसे वीज वाहतुक व दळणवळणाच्या सोयी, आरोग्याच्या सेवा इत्यादी त्याचप्रमाणे जलसिंचन, मोठे आणि मध्यम प्रकल्पाचा फायदा मोठ्या शेतकऱ्यांनी घेतला. सरकारने लघुसिंचन प्रकल्पाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे लहान व सिमांत शेतकऱ्यांना त्याचा लाभ होऊ शकला नाही.

**संदर्भसूची**

1) प्रभाकर रामचंद्र कुलकर्णी, भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद (1999)
2) रायखेलकर / दामजी, भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद (2003)
3) माधव बिरादार महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद (2018)
4) महाराष्ट्राची आर्थीक पहाणी 2018-19 अर्थ व सांख्यीकीय संचानलाय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन मुंबई
5) Maharashtra Development Report, Planning Commission Government of India Academic Foundation New Delhi.
6) Misra & Puri, Indian Economy, Himalaya Publishing House, Mumbai (2012)
7) Rudra Datta & Sundaram, Indian Economy, S Chand & Company Ltd. New Delhi.

Scanned with Oken Scanner